# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०३/१०/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील दुर्गा चौक काटोल येथे दिनांक ०१/१०/२०२२ चे २१.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. सुंगीता सुरेशराव मोकेडे, वय ४८ वर्ष, रा. हनुमान मंदीर पंचवटी काटोल या आपल्या मुलीसोबत देवी पाहण्याकरिता गेले असता, देवी पाहल्यानंतर महाप्रसाद घेण्याकरिता दुर्गा चौक येथे गेले. त्यांनी महाप्रसाद घेवून गर्दीतून बाहेर आले तेव्हा फिर्यादीने गळयात घातलेली सोन्याची चैन दिसली नाही. फिर्यादीचे गळयात घातलेली जुनी वापरती सोन्याची चैन १५ ग्रॅम किंमती ४०,०००/—रूपयाची अज्ञात आरोपीने गर्दीचा फायदा घेवून गळयातुन न कळत चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल मो. क्र. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

### ट्रक चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील सोनु होंडा शाईन शोरूम समोर येथे दिनांक ०१/१०/२०२२ चे २१.०० वा. ते दिनांक ०१/१०/२०२२ चे २१.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अनिल गटया पंडगुलवार, वय ३० वर्ष, रा. मुन्ना गॅरेज चे मागे, दत्तनगर चनकापुर, खापरखेडा याने यांचा ट्रान्सपोर्टींग चा काम असुन त्यांनी आपला एमएच— ४०/७३५८ क्रमांकाचा ट्रक किंमती ६,००,०००/—रू. हा सोनु होंडा शोरूम समोर सर्वीसरोडवर उभा केला होता. फिर्यादी यांचा मित्र अनिल सिंग याने सांगीतले की, ‘तुझा ट्रक तिन ईसम ताब्यात घेवुन पळत आहे’ अशी माहितीवरून फिर्यादी व त्यांचे मित्र यांनी ट्रकचा पाठलाग केला असता चनकापुर येथे ईमलीच्या झाडाजवळ फिर्यादी यांचा ट्रक उभा मिळुन आला. तपासा दरम्यान आरोपी क्र. १. रंजीत विश्वनाथ यादव, वय ४५ वर्ष, रा. इंदिरा नगर, खापरखेडा व २ विधिसंघर्ष बालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ ला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उमेश ठाकरे मो.नं. ९८२२७६४९९९ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर